




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०५ | अंक : ७९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०२ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## उपराजधानीत २० दिवसांत चार मातामृत्यू !



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, नागपूर :** लता मंगेशकर हॉस्पिटलमध्ये २० दिवसांत चार मातामृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आरोग्य विभागाने समिती स्थापन केली आहे. ऑपरेशन थिएटर तातडीने बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. औषधांचे नमुने तपासणीसाठी अन्न व औषध प्रशासनाकडे पाठविण्यात आले आहेत.

मृत्यू झालेल्यांमध्ये हिंगण्यातील दोन, खापरीतील एक आणि गडचिरोलीतील एका महिलेचा समावेश आहे. पहिला मृत्यू ८ ऑक्टोबर रोजी झाला. या कालावधीत काही मृत्यू झाले असून चौथा मृत्यू ३० ऑक्टोबर रोजी झाला. शासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेत आरोग्य विभागाचे सहायक संचालक डॉ.श्रीराम गोगुलवार यांच्या अध्यक्षतेखाली चौकशीसाठी समिती नेमली आहे. या समितीत स्त्रीरोगतज्ज्ञ, जिल्हा बालसंगोपन अधिकारी, मेडिकल, मेयो येथील डॉक्टर अशा आठ जणांचा समावेश आहे. शुक्रवारी या समितीने हॉस्पिटलला भेट देऊन हॉस्पिटलची तपासणी केली. मृत्यूची तीन प्राथमिक कारणे

अचानक झालेल्या मातामृत्यूची कारणे शोधत असताना, प्रामुख्याने तीन प्राथमिक कारणे समोर आली आहेत. त्यात रक्त गोठण्याची प्रक्रिया थांबून अतिरिक्त रक्तस्राव होणे, किडनीवर सूज येणे, इतर अवयवांवर सूज येणे यांचा समावेश आहे, अशी माहिती समितीच्या सदस्यांनी दिली.

**● संसर्ग की औषधोपचार?**

मातामृत्यूची कारणे समोर आली असताना, त्यास संसर्ग जबाबदार आहे की, चुकीची औषधे याचा शोध समिती घेत आहे. सिझरनंतर हे मृत्यू झाले असल्याने ऑपरेशन थिएटरमधून हा संसर्ग पसरला असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्याची सत्यता तपासण्यासाठी तीन दिवस नमुने घेतले जाणार आहेत.

**● 'त्या' औषधांचा वापर थांबविला...**

या महिलांच्या ऑपरेशनसाठी वापरण्यात आलेल्या औषधांचा वापर तात्पुरता थांबविण्यात आला आहे. ज्या बॅचची ही औषधे होती, ती बेंच औषधांच्या साठ्यातून बाजूला काढण्यात आली आहे. अँटिबायोटिक, पेनकिलर अशा औषधांचा यात समावेश आहे. औषधांचे नमुने अन्न व औषध प्रशासन विभागाकडे (एफडीए) तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. या घटनांचा तपास सुरू असून नमुने एफडीएकडे पाठविण्यात येणार आहे, असे चौकशी समितीचे अध्यक्ष डॉ. गोगुलवार यांनी सांगितले. तर, 'नऊ महिन्यात एकही मृत्यू या हॉस्पिटलमध्ये झाला नाही. मात्र २० दिवसांत चार मृत्यू झाले आहेत. तपासात डॉक्टरांकडून हलगर्जीपणा झाला असे कुठेही आढळून आलेले नाही' असे लता मंगेशकर हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नितीन देवस्थळे यांनी सांगितले.

## विलंब नको, शेतकऱ्यांना तत्काळ न्याय द्या : निलेश लंके




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, अहिल्यानगर :** शेतकऱ्यांचा मोबदला हा त्यांचा हक्क आहे, उपकार नाही. विकासाच्या नावाखाली त्यांची जमीन घेतली, पण मोबदला मिळत नसल्यास तो अन्यायच आहे. या प्रकरणात वेळकाढूपणा चालणार नाही. संबंधित विभागांनी समन्वयक साधून लवकरात लवकर सर्व शेतकऱ्यांना योग्य मोबदला द्यावा. केंद्र व राज्य सरकारकडे मी स्वतः वैयक्तिकरित्या पाठपुरावा करणार आहे, असे प्रतिपादन खासदार निलेश लंके यांनी सांगितले.

नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनामुळे बाधित झालेल्या पारनेर तालुक्यातील सावरगाव व धोत्रे बुद्रुक येथील शेतकऱ्यांना अद्यापही योग्य मोबदला न मिळाल्याने गेल्या काही वर्षांपासून असंतोष वाढत होता. अखेर या प्रलंबित प्रकरणावर तोडगा काढण्यासाठी शुक्रवारी (ता.३१) प्रांताधिकारी कार्यालय येथे खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत महत्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

सन २०१५ मध्ये नगर-कल्याण महामार्गाचे काम वेगाने पूर्ण व्हावे यासाठी या मार्गालगतच्या शेतजमीनी मोठया प्रमाणावर संपादित करण्यात आल्या होत्या. महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे विविध गावाचा बराचसा भाग प्रभावित झाला. परंतु नऊ वर्षानंतरही सावरगाव व धोत्रे येथिल शेतकऱ्यांना भरपाई मिळाली नाही,जी इतर शेतकऱ्यांच्या खात्यावर यापूर्वीच जमा झालेली आहे. शेतकऱ्यांनी वारंवार शासन, महसूल व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केला, मात्र प्रक्रियात्मक गुंतागुंत, कागदपत्रे व विभागांतील समन्वयाअभावी मोबदला वितरणाचा प्रश्न अनुत्तरित राहिला असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या बैठकीदरम्यान शेतकऱ्यांनीही आपल्या भावना मांडल्या. आम्ही विकासासाठी जमीनी दिल्या. परंतु नऊ वर्षांनंतरही मोबदल्यासाठी शासनदरबारी हेलपाटे मारावे लागतात. आता आमचा संयम सुटला आहे. प्रशासनाने तातडीने न्याय घ्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी यावेळी केली.

# बडव-बडव बडवायचे आणि...राज ठाकरेंचा हल्लाबोल !!






**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, मुंबई :** आज मुंबईमध्ये महाविकास आघाडी आणि त्यांच्या समर्थक पक्षांनी सत्याचा मोर्चा आयोजित केला होता. हा मोर्चा निवडणूक आयोगाच्या मतदार याद्यांमधील घोळाविरूद्ध होता. यावेळी हजारो कार्यकर्ते सहभागी झाले होते. या मोर्चात विरोधकांची एकजूटही पाहायला मिळाली. मोर्चाला शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे, मनेसेप्रमुख राज ठाकरे , राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात उपस्थित होते. या मोर्चात सर्वांनी निवडणूक आयोगाविरुद्ध जोरदार भाषणं केली. मतदार याद्या स्वच्छ करा मग निवडणुका घ्या, दुबार मतदारांची नावे हटवा अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी राज ठाकरेंनीही घणाघाती भाषण केलेले पाहायला मिळाले. आपल्या भाषणामध्ये त्यांनी सत्ताधारी महायुतीवर हल्लाबोल केला. त्यांनी मतदारयाद्यांमधला घोळ स्वच्छ केल्याशिवाय निवडणुका घेऊ नका असं म्हटलं आहे. राज ठाकरेंनी यावेळी जे लोकं निवडणूक आयोगात घुसले आहेत. त्यांच्याकडून निवडणुका जिंकून घेतल्या जात असल्याचा आरोप केला आहे. याला काय निवडणुका म्हणतात का? एक आमदार स्वतः सांगतो की मी २० हजार मत बाहेरुन आतमध्ये आणली. म्हणजे यांची हिंमत बघा, सत्तेचा माज बघा, असं राज ठाकरे म्हणाले आहेत.

मतदारयाद्या तपासताना मुलीचं वय १४, वडिलांचं वय १४३, काहीही चालू आहे. नवी मुंबईमध्ये आयुक्तांच्या बंगल्यावर मतदार नोंदवले गेले आहेत. कोणी सुलभ शौचालयामध्ये नोंदवला गेला आहे. कुठेही बसलेला दिसला की नोंदवायचा का? असा प्रश्न राज ठाकरेंनी उपस्थित केला आहे.

राज ठाकरेंनी 'सत्याचा मोर्चा'मध्ये मतदार याद्यातील घोळाबाबत बोलताना दुबार-तिबारवाले मतदार दिसताच फोडून काढणार, असा इशाराच दिला आहे. ते म्हणाले की, निवडून आलेले लोकही स्वतःला चिमटे काढून बघत होते. हे सगळे असे प्रकार सुरु आहेत. कशा निवडणुका घ्यायाच्या मला जरा सांगा. जो मतदार रांगेत उभा राहून मतदान करतो. त्याच्या मताला काय किंमत आहे. आधीतर तुम्ही या गोष्टी घरोघरी पोहोचवा, मतदार याद्यांमध्ये कसा घोळ सुरु आहे याबद्दल जनजागृती करा आणि त्यानंतरही जर समजा हे दुबार तिबारवाले मतदान सुरु असताना तिथे आले तर तिथेच फाडून काढायचे. बडव-बडव बडवायचे आणि मग पोलिसांच्या हातात द्यायचे. त्याशिवाय महाराष्ट्रामध्ये चाललेला हा प्रकार थांबणार नाही, असं राज ठाकरे म्हणाले आहेत.

यावेळी त्यांनी मतदार यादीत किती दुबार-तिबार मतदार आहेत, याची माहिती देणारी कागदपत्रे आपल्याकडे असल्याचा दावा केला आहे. तसेच त्यांनी ही सर्व कागदपत्रे असलेला गठ्ठाही सोबत आणलेला यावेळी पाहायला मिळाला. हजारो मतदारांनी दुबार मतदान केले आहे, आजचा मोर्चा ताकद आणि राग दाखवण्यासाठी आहे, असे ते म्हणाले.

## माथेरानमधले ४०० घोडे झाले बेघर; अश्वपाल बांधवांचा आक्रोश...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, माथेरान (रायगड) :** अमुल कुमार जैन: माथेरान गिरीस्थान हिरवाईने नटलेले, मुंबई-पुणेकरां सहित देश विदेशातील पर्यटकांना आवडणारे पर्यटनस्थळ आहे, पण या सुंदर डोंगरमाथ्यावरील शांती आणि पर्यटनाचा ताल आज विस्कळीत झाला आहे. माथेरानच्या दस्तुरी नाका परिसरात आज प्रशासनाने संयुक्तरीत्या केलेल्या कारवाईमुळे तब्बल ४०० घोडे बेघर झाले असून, घोडे व्यवसायावर आपलं जीवन अवलंबून ठेवणाऱ्या अश्वपाल समाजात प्रचंड संताप उसळला आहे.

नगरपालिका आणि महसूल विभागाने भूखंड क्र. ९३ वर उभारण्यात आलेले घोड्यांचे प्लास्टिक शेड हटवले आहे. या जागेवर अश्वपाल समाज मागील अनेक वर्षांपासून तबेले उभारून घोड्यांची देखभाल करत होता. मात्र, वाहतूक कोंडी आणि पार्किंगच्या कारणावरून



प्रशासनाने मोठ्या बंदोबस्तात ही कारवाई केली. परिणामी, माथेरानमधील मालवाहतूक, पर्यटन सेवा आणि स्थानिक व्यावसायिकांचे अर्थचक्रच ठप्प होण्याची भीती निर्माण झाली आहे. माथेरान हे भारतातील एकमेव 'नो व्हेईकल झोन' क्षेत्र आहे. येथे वाहनबंदी असल्याने, हॉटेल्ससाठी अन्नपदार्थ, बांधकाम साहित्य, जीवनावश्यक वस्तू तसेच पर्यटकांची मालवाहतूक ही पूर्णपणे घोड्यांवर अवलंबून असते. त्यामुळे घोड्यांचा व्यवसाय हा या प्रदेशाच्या अर्थचक्राचा अविभाज्य भाग बनला आहे. पण आता या घोड्यांना निवारा उरला नाही, त्यामुळे अश्वपाल समाज अक्षरशः उघड्यावर आला आहे.

या कारवाईविरोधात अश्वपाल संघटनेच्या महिलांनी दस्तुरी नाक्यावर मोठा आक्रोश केला. आमच्या घोड्यांसाठी कायमस्वरूपी तबेल्यांची जागा उपलब्ध करून द्यावी, अशी त्यांची मागणी आहे. त्यांनी प्रशासनाच्या निर्णयावर रोष व्यक्त करत विचारलं की आमचे घोडे ऊन-पावसात, हिवाळ्यात कोठे राहणार? त्यांची काळजी कोण घेणार? दरम्यान, स्थानिक हॉटेल व्यावसायिक आणि व्यापारी वर्गातही चिंता पसरली आहे. कारण घोड्यांशिवाय माथेरानमधील सर्व मालवाहतूक ठप्प होण्याची शक्यता आहे. याचा थेट परिणाम पर्यटनावर आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर होणार आहे.

अश्वपाल समाजाचा उपजीविकेचा आधार हिरावल्यामुळे संपूर्ण माथेरान हादरलं आहे. प्रशासनाच्या निर्णयावरून आता राजकीय स्तरावरही चर्चा रंगू लागली आहे. वारसा जपणाऱ्या माथेरानच्या या घोड्यांचा विस्थापितपणा पर्यटनाचं भविष्य बिघडवणार का? असा प्रश्न आता उभा राहिला आहे.

## मुंबईत कबुतरांना खाद्य देण्यासाठी महापालिकेची चार ठिकाणांना मान्यता

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.३१, मुंबई :** मुंबई महानगरपालिकेने अखेर कबुतरखान्यांबाबत मोठा निर्णय घेतला आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बंद असलेल्या कबुतरखान्यांच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने चार नवीन ठिकाणी नियंत्रित खाद्य टाकण्यास परवानगी दिली आहे. या ठिकाणी फक्त सकाळी ७ ते ९ या वेळेतच कबुतरांना दाणे देता येतील.

स्वयंसेवी संस्थांना जबाबदारी स्वीकारुन या कबुतरखान्याचे व्यवस्थापन करावे लागणार आहे. तसेच तज्ज्ञ समिती अहवाल आणि न्यायालयाचे आदेश प्राप्त होईपर्यंत ही अंतरिम व्यवस्था राहणार असल्याचं महापालिकेने स्पष्ट केलं आहे. त्याचसोबत सध्या बंद करण्यात आलेले कबुतरखाने सुरु करण्यास परवानगी दिलेली नाही, ते बंदच राहणार असंही महापालिकेने स्पष्ट केलं आहे.

दरम्यान ही चार ठिकाणं पुढील प्रमाणे असणार आहेत.

१. वरळी जलाशय
२. अंधेरी पश्चिम येथील लोखंडवाला बॅक रोडवरील खारफुटी परिसर
३. ऐरोली-मुलुंड जकात नाका परिसर
४. बोरिवली पश्चिमेतील गोराई मैदान

या चारही ठिकाणी कबुतरांना दाणे टाकण्याचे काम स्वयंसेवी संस्थांकडे सोपवले जाणार आहे. परवानगी मिळण्यासाठी संस्थांनी कबुतरखान्याचे संपूर्ण व्यवस्थापन, परिसराची स्वच्छता, नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ कारवाई आणि आरोग्याविषयी जनजागृती याची जबाबदारी घ्यावी लागेल.

संस्थेकडून यासंबंधी प्रतिज्ञापत्र घेतले जाईल. तसेच संबंधित प्रशासकीय विभागांचे सहाय्यक आयुक्त हे या ठिकाणांचे समन्वय अधिकारी म्हणून नियुक्त केले जातील.

महानगरपालिकेकडे कबुतरखान्यांबाबत नागरिकांकडून ९७७९ सूचना आणि हरकती प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये कबुतरखाने कायम ठेवणे, बंद करणे, स्वच्छता राखणे आणि कंट्रोल्ड फीडिंग या सर्व बाबींचा समावेश आहे. दरम्यान तज्ज्ञ समितीचा अहवाल आणि माननीय न्यायालयाचे अंतिम आदेश मिळेपर्यंत ही व्यवस्था तात्पुरती स्वरूपात लागू राहील. त्यामुळे विद्यमान कबुतरखाने सुरू करण्यास परवानगी दिलेली नाही, हे स्पष्ट करण्यात आले आहे. महानगरपालिकेने स्पष्ट केलं आहे की या निर्णयाचा उद्देश कबुतरांना अन्न मिळावं, पण सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता आणि आरोग्याच्या समस्या टाळाव्यात.




## अजून किती खड्ड्यात घालणार?

छत्रपती संभाजीनगर–पुणे महामार्ग राज्यात सर्वाधिक रहदारी असलेल्या रस्त्यांपैकी एक. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, हिंगोली या जिल्ह्यांसह विदर्भ तसेच खान्देशातून पुण्याला जोडणारा हा प्रमुख रस्ता. दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते. रस्त्यावरून वाहतूक विनाअडथळा, सुरळीत व्हावी, या उद्देशाने सार्वजनिक बांधकाम विभागाने 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' (बीओटी) तत्त्वावर रस्ता रुंद व चौपदरी केला.

बीओटीच्या नियमानुसार सहा ठिकाणी टोलनाके सुरू केले. टप्पेनिहाय वाहनांची वाढलेली वर्दळ आणि नियोजित वेळापत्रक पाहता काही ठिकाणचे टोल नाके बंद झाले. काही वर्षांपूर्वी राज्य सरकारने कार, खासगी चारचाकी छोट्या गाड्यांना टोलमाफीचा निर्णय घेतला. आता या रस्त्यावर जे टोलनाके सुरू आहेत, तिथे मोठ्या वाहनांकडून टोलवसुली होते. ज्या टप्प्यांचे टोलनाके बंद झाले तिथे देखभाल, दुरुस्ती करायची कुणी? हा सरकारी खात्याचा नेहमीचा प्रश्न समोर आला आणि रस्त्याकडे दुर्लक्ष सुरू झाले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागतिक बँक प्रकल्प विभागांतर्गत हा रस्ता असल्याने निधीसाठी दुय्यम प्राधान्य मिळत असल्याची तक्रार होत होती आणि त्यात बऱ्याचअंशी तथ्य होते. रस्त्याची कनेक्टिव्हिटी असलेल्या जिल्ह्यांतील स्थानिक लोकप्रतिनिधींची अनास्था, दुर्लक्ष आणि दबावगट कमी पडत असल्याने अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर रस्त्याची पुरती वाट लागली आहे.

नगर ते वडाळा हा ३९ किलोमीटरचा रस्ता सध्या पूर्ण खड्ड्यात गेला आहे. खड्ड्यांमध्ये पाणी साचून मोठेमोठे ट्रक आडवे पडून अपघात झाले. थातुरमातुर ठिगळपट्टीचे सोपस्कार पार पाडले गेले, पण त्यातून अपेक्षित साध्य झाले नाही. गेल्या कित्येक महिन्यांपासून खड्ड्यांचा त्रास कायम आहे. अशीच परिस्थिती छत्रपती संभाजीनगर ते वडाळा टप्प्यात आहे. दोन्ही बाजूंनी रस्ता पूर्ण उखडला आहे. खड्डे चुकविण्याच्या नादात दररोज छोटे मोठे अपघात होत आहेत. दरम्यान, राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसी) स्थापन करून रस्ते विकासाचा नवीन अध्याय सुरू करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. या यंत्रणेमार्फत राज्यभर काही प्रकल्प सुरू करण्यात आले. मुंबईतून काही अधिकारी मंडळींना या रस्त्यासाठी नवी कल्पना सुचली. पुणे ते शिरूर आणि अहिल्यानगर ते वडाळा हे दोन टप्पे 'एमएसआयडीसी'कडे देखभाल दुरुस्तीसाठी देण्याचा निर्णय घेतला गेला. हे आव्हान पेलण्यास संबंधित यंत्रणेने निधीच्या अडचणीवरून नकार दिल्याचे सांगितले जाते. मुळात निधीची कुठलीच तरतूद न करता थेट निर्णय कसे घेतले जातात, हे कोडेच आहे.

एकूण छत्रपती संभाजीनगर–पुणे रस्त्याचा दर्जा पुरता खालावला आहे. तत्काळ निधी उपलब्ध करून रस्त्याची देखभाल दुरुस्ती कधी करणार, याचे उत्तर 'पीडब्ल्यूडी'लाच शोधावे लागणार आहे. अस्तित्वात असलेल्या रस्त्यांकडे नीट लक्ष देणे शक्य होत नसताना नव्याने रस्त्यांची घोषणा करणे राजकीय मंडळी कधी थांबवणार? रस्ते विकासाचे कुठलेही व्हिजन दिसत नाही, नवीन प्रकल्पांसाठी आर्थिक स्रोत कुठून उभे करणार, याची ठोस माहिती नाही. मुंबईत बसून निर्णय जाहीर करणे सोपे आहे, पण नेमकी गरज ओळखून उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्याचा मुहूर्त 'पीडब्लूडी'ने लवकर साधावा, अशी अपेक्षा आहे. पुणे–छत्रपती संभाजीनगर खड्डेमय रस्त्याची चर्चा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर झाली. संताप व्यक्त होताच पीडब्लूडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून स्थळपाहणीचे सोपस्कार पार पाडले. दुरुस्तीसाठी प्रस्ताव पाठविण्याचे आदेश दिले गेले. मुळात सरकारकडे पैसे आहेत काय, हाच प्रश्न आहे. दोन दशकांपूर्वी बांधलेला रस्ता दोन्ही बाजूंनी सात मीटर आहे. आता वाढलेली वाहतूक पाहता दोन्ही बाजूंनी किमान तीन–तीन मीटर रुंदीकरण आवश्यक आहे, पण त्याआधी रस्त्याची दुरुस्ती तत्काळ करणे आवश्यक आहे.

# एक तरी वारी आचरावी...

...चंद्रभागेच्या तिरावर पंढरपूर येथील विठ्ठल–रखुमाईच्या दर्शनासाठी अफाट जनसागर (वारकरी, गरीब–श्रीमंत, आंधळे–पांगळे, सर्व जाती–धर्माचे) आषाढी एकादशी दिवशी टाळ–मृदुंगाच्या गजरात 'विठूचा गजर हरीनामाचा झेंडा रोविला... असे म्हणत' पंढरपूरमय होतो.

महाराष्ट्रात मध्ययुगामध्ये अनेक भक्तिसंप्रदाय उदयास आले आणि कमी–अधिक काळ आपला प्रभाव गाजवून क्षीण झाले किवा नामशेष झाले, मात्र महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय याला अपवाद ठरला आहे. या संप्रदायाचा प्रभाव सतत वाढतच राहिलेला आहे. अगदी १९व्या, २० व्या आणि २१ व्या विज्ञाननिष्ठ शतकामध्येही हा संप्रदाय टिकून आहे. एवढेच नव्हे तर तो समाजशास्त्र आणि साहित्य संशोधक यांच्या कुतूहलाचा विषय होऊन राहिला आहे. पंढरपूरची वारी हा प्रकार महाराष्ट्रातील वारकरी भक्तिसंप्रदायाला इतर भक्तिसंप्रदायांपासून खास रितीने वेगळा ठरविणारा आहे. काही तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्धीला आलेल्या किंवा पुराणकाळापासून माहात्म्य लाभलेल्या काशी, जगन्नाथपुरी, बद्रिकेश्वर, बालाजी तिरुपती, रामतीर्थ इत्यादी तीर्थक्षेत्रासारखे पढरपूर हे क्षेत्र नाही. पंढरपूरची वारी हा तीर्थक्षेत्रापेक्षा वेगळा प्रकार आहे. पंढरपूरची वारी करणे म्हणजे, तीर्थयात्रेचे पुण्य गाठीस बांधणे अशी काही भावना कोणताही वारकरी बाळगून नसतो. दुसरी आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे,

इतर तीर्थक्षेत्रांना यात्रा महणून जाऊन येण्याचा दबाज (पद्धत) असचा व्याक भनेचा दैनंदिन जीवनाशी अतूट संबंध असतोच असे नाही. उलटपक्षी तो तगा नसतो असे म्हणता येईल; परंतु पढरपूरची वारी करणाऱ्या माणसांचे जीवन अगदी बदलून जावे अशी अपेक्षा असते. मुख्य म्हणजे आपण वारकरी असून वारकऱ्याचे व्रतस्थ जीवन जगत आहोत याची निदर्शने करणाऱ्या तुळशीमाळा, त्रिपुंडा किंवा खांद्यावर 'भगवी पताका व तो टाळ–मृदुंगाचा आवाज यासारख्या खाणाखुणा त्याने निश्चयाने बाळगाव्यात अशीही अपेक्षा असते एवढेच नव्हे तर त्याने भगवद्भक्ती करावी, कोणत्या यंत्राचे आणि ग्रंथाचे पंठण करावे यासंबंधानेही काही आदेश असतात. खरा वारकरी या आदेशांचे जास्तीत जास्त पालन करण्यात धन्यता मानतो. अन्य पंथांमध्ये दाखल होणाऱ्या भक्तांवर अशाच प्रकारच्या आदेशांचे निबंध असले, तरी त्या निर्बंधांना कर्मकांडाचे स्वरूप आलेले असते. वारकरी पंथामध्ये कर्मकांडाचा मुळागत निर्बंध केलेला



वसा वारकरी सांप्रदयाचा

## कार्तिकी एकादशी विशेष !!

आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे अन्य भक्तिसंप्रदायांपेक्षा असलेले वेगळेपण अनेक प्रकारे सांगता येईल. येथे फक्त एका महत्त्वाच्या गोष्टीचा निर्देश करायचा आहे, तो म्हणजे वारकऱ्यांचे कुलदैवत कुठलेही असो, वारकरी होताच पंढरपूरच्या विठ्ठलाचा भक्त होऊन जाता, यातही पुन्हा वैशिष्ट्य असे पंढरपूरच्या विठ्ठलाची भक्ती स्वीकारल्यावर अन्य देवतांच्या भक्तीचा त्याने त्याग करावयास पाहिजे असे बंधन त्याच्यावर नसते. त्यातूनच मग तो ईश्वराकडे (परमेश्वर) एकत्वबुद्धीने पाहण्यास शिकतो, म्हणूनच महासमन्वय ही संस्कृती घेऊन उभा राहिलेला वारकरी पंथ महाराष्ट्रात नुकताच लोकप्रिय झाला असे नव्हे, तर शतकानुशतके खंबीरपणे पाय रोवून स्थिरावला आहे. ज्ञानदेव, नामदेवाच्या काळी महाराष्ट्रावर असलेल्या अस्मानी–सुलतानी आपत्तीमध्ये जनतेचा धीर खचू न देता त्यांची मने समर्थ बनविण्याचे काम या थोर संतांच्या भागवत धर्माने केले, ज्ञान, ऐश्वर्य, शक्ती, बळ, वीर्य, तेज या सहा गुणांनी संपन्न असणाऱ्या भगवंताचा धर्म शक्तिगर्भआहे. यातून स्वराज्य प्राप्त होते, रक्तहिन सामाजिक क्रांतीची विचारधारा निर्माण करण्याची ताकद या विचारसूत्रीत असली, तरी या गोष्टीस दुबळेपणा–भेकडपणाचे स्वरूप नसावे, म्हणून संत तुकाराम म्हणतात, 'तरी भले देऊ कासेची लंगोटी। नाठाळाच्या माथी हाणु काठी । वारकरी संघाच्या विचारांत जातिभेद, विषमता, अज्ञान, अंधश्रद्धा यांचा विचार होताना विठ्ठल उपासना आणि पंढरपूर वारीचे पडसाद उमटतात. ईश्वरप्राप्तीसाठी संसार न सोडता संसारात राहूनदेखील पारमार्थिक आनंद मिळवता येतो हे वारीतून दिसून येते. जीवनाचे ध्येय भक्ती हेच मानले आहे. मनामनातील मशागत, करणारा वारकरी संप्रदाय जीवन अंतर्बाह्य बदलून टाकतो, शुद्धाचरण सात्विक आहाराबरोबर चांगल्या विचारातून परस्पर द्वेष, मद, क्रोध, त्वेष यांसारख्या गोष्टींपासून दूर राहण्याची शिकवण जणू वारी–वारकरी आचारात मिळते, यालाच आध्यात्मिक अभ्यास म्हटला जातो.

वारीला सुरुवात केली की, वर्षानुवर्षे पायी वारी करून वारकरी विठ्ठलमय होतात, वारीची परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते. कोल्हापूरच्या गडहिंग्लज तालुक्यातील जखेवाडी गावच्या ह.भ.प के. जनाबाई शिवाप्पा संकपाळ यांनी आयुष्यात ३६ पायी वाऱ्या केल्या. १०५ व्या वर्षी माऊलीचे निधन झाले. त्यांची शेवटची इच्छा अशी होती की माझी अस्ति पंढरपूरच्या चंद्रभागेत करावी त्यांचे नातू..देवदास संकपाळ यांनी अस्तितचंद्र बघत जाऊन विसर्जन करून आपल्या आजीची शेवटची मनोकामना पुरी केली.त्यानंतर त्याच्या मोठ्या सूनबाई इंदुबाई मारुती संकपाळ तसेच त्यांचे पुत्रूड...शिवाजी चौगुले व त्यांच्या पत्नी प्रियांका यांनी तुळशीमाळ घालून वारीची परंपरा अखंडपणे सुरू ठेवली आहे.

पंढरीची वारी आहे माझे घरी। आणिक न करी तीर्थव्रत ।। व्रत एकादशी करीन उपवासी। गाईन अहर्निशी मुखी नाम।। नाम विठोबाचे घेईन मी वाचे। बीज कण्यांतीचे तुका म्हणे...!!

वारकऱ्याऱ्यांचा पोषाख पांढरा शुभ्र कुडता, धोतर व डोक्यावर टोपी, गळ्यामध्ये तुळशीच्या माळा, हातामध्ये भगवा पताका व कपाळावर गंध, भजन–कीर्तनामध्ये ते. धुंद असतात. धुंद असतेवेळी बघताना असे वाटते की, आपणही त्यांच्यामध्ये मग्न व्हावे, म्हणून आयुष्याला येऊन एक तरी वारी आचरावी... पंढरपूरची...!!

***!! जय जय राम कृष्ण हरी!!***

**- ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.बेलेवाडी (मासा)**
**कागल- कोल्हापूर.**

# वारीचे माहात्म्य !

महाराष्ट्रातील सर्वात मोठा लोकोत्सव म्हणजे पंढरीची वारी. दरवर्षी आषाढी – कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होतात. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास केल्यानंतर विठुरायाचे झालेले मुखदर्शन साक्षात भगवंतप्राप्ती झाल्याचे सुख त्यांना देते. आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी। संत नाम देव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर ! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे. पृथ्वीवरी तीर्थे असती अपार । परी पंढरीची सर । एकाही नाही ।। असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर न करी आळस । जाय पंढरीशी । अवघी सुखराशी । तेथे आहे ।।, असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच 'अवघी दुमदुमली पंढरी । भगव्या पताका खांद्यावरी । तुळशी वृंदावन डोक्यावरी । भाव भुकेल्यांची ही वारी ।,' असे म्हटले जाते. संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वारकरी राम कृष्ण हरी । असे नामसंकीर्तन सतत करत पंढरीस जातात. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणार्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. वारीमध्ये व्यष्टीसह समष्टी साधनाही होते आणि सर्व जिवांच्या उद्धारासाठी विठ्ठलाला पंढरपुरात भूतलावर यावेच लागते. या तीर्थाचा महिमाच असा आहे. येथील भक्तांच्या तळमळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेच लागते. पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे. भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचीती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. शिस्तीचे दर्शन हे पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी–वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशीच सर्व दिंडयांची रचना असते. टाळ वाजवणार्या वारकर्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी–वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना ! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी !




पांडुरंग हे सामान्यांचे दैवत आहे. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे. वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, ''अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच ! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते.'' संत ज्ञानदेव म्हणतात, 'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।' म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे. तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे. त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत. तो आत–बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो 'पांडुरंग' आहे. एकदा लहानपणी संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली, ''अरे दादा, तू या पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे.'' त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''मुक्ता, मी तुला गुरुमुखातून सांगतो. अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे.'' एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे. तो कष्टकरी, शेतकरी, सामान्यजन आणि अनाथ यांचा कैवारी आहे; म्हणून तो (उन्हात कष्ट करून रापलेला असा) काळ्या रंगाचा झाला आहे. असा हा सगुण–निर्गुण रूपी पांडुरंग आहे. पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला 'वीरभद्र' म्हणजेच 'विठ्ठल' म्हणतात, तर वैष्णव त्याला 'गोपाळकृष्ण' असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो 'हरिहर' आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण 'विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे', असेही म्हणतात. (आद्यशंकराचार्यांच्या काळात भारतात काही नवीन धार्मिक प्रवृत्तींचा उदय होऊन जैन, बौद्ध इत्यादी धर्मपंथ उदयास आले होते. महाराष्ट्रातही बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याचे दिसून येते; कारण कोकण किनारपट्टी, घाटमाथा, मराठवाडा येथील सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये बुद्धाच्या कलाकृती असलेल्या गुंफा दिसतात.) जैन विठ्ठलाला 'तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे', असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून 'विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा', असे जैनांचे मत आहे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

### हडप...

**इस्टेट मोक्यावरची**
**मना तळमळ तडप**
**अस्वस्थ होई सतत**
**कधी करतोयं हडप**

**ट्रस्ट एखाद बनवून**
**उघडहळूवार झडप**
**संधी साधून बरोबर**
**झट्कन घाल झडप**

**करे शिकार वाघाची**
**तयार करायचे उडप**
**राजरोस उजळमाथे**
**भक्ष्य करायचे गडप**

**बाहेर काढती लफडी**
**वेळेवर प्रकरणं दडप**
**मिंधे करायचेवाचाळ**
**खुबीने वापरावे पडप**

**काहीनाठाळ तय्यार**
**घालून बसलेत मंडप**
**डोळ्यात अंजनघाले**
**चालले मिरचीकांडप**

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### घरफोडी करणारे ६ आरोपी किन्हवली पोलिसांच्या ताब्यात

**अक्षराज : सुनिल फर्डे**



**दि.०१, शहापूर (ठाणे) :** किन्हवली विभागातील ढाढरे हद्दीत साखरपाडा येतील सीताराम विठ्ठल उमवणे यांच्या घराच्या मागच्या बाजूने खिडकीचे ग्रिल कापून या चोरट्यांनी घरामधील लोखंडी कपाटातील लॉकर तोडून १३ तोले सोने, मोबाईल व इतर मुद्देमाल मिळून १७ लाख ३० हजार ७८० रुपये किमतीचा मुद्देमाल किन्हवली पोलिसांनी हस्तगत केला. ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डी.एस.स्वामी, शहापूरचे उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली किन्हवली पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक नितीन खैरनार यांनी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर तलेकर यांच्याकडे तपास सोपवण्यात आला असता, त्यांनी पोहवा/महेश दळवी, पोशि/सचिन चोरगे, पोशि/बडेराव, पोशि/शिंगे,पोशि/गवारी, पोशि/बांगर, पोशि/हिंदुराव, पोशि/बेलवले, पोशि/शालवले,पोशि/पारधी, पोशि/कंटे, पोशि/शिंदे, मपोशि/स्वप्नाली पवार तपास पथक तयार करून गुन्ह्याचा तपास सुरू केला. घटनास्थळी कोणतेही सी.सी.टीव्ही फुटेज नसल्याने कोणत्याही प्रकारचे धागेदोरे उपलब्ध झाले नाहीत. परंतु गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून अतिशय बारकाईने घटनास्थळापासून जोडणाऱ्या रस्त्यांचे सी.सी. टीव्ही फुटेज काढून गुन्ह्याचा तपास करून घरफोडी करणारे ६ आरोपी गुंड्याचापाडा, खरीवली, अघई, नारायणगाव, सापगाव येथून ताब्यात घेण्यात आले. त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम नुसार ३०५,३३१(३),३४१(४) दाखल करण्यात आला आहे. यामुळे किन्हवली पोलिसांचे किन्हवली परिसरातील जनतेकडून कौतुक होत आहे.

### आदिवासी बांधवांच्या घरकुल प्रश्नासाठी राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचे निवेदन



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०१, विंचूर (नाशिक) :** बौद्ध, दलित, आदिवासी, ओबीसी व अल्पसंख्याक समाजांच्या हक्कासाठी राष्ट्रीय रिपब्लिकन पक्ष सदैव लढत असून निफाड तालुक्यातील मौजे देवगाव येथील आदिवासी बांधवांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या घरकुल प्रश्नासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अण्णासाहेब कटारे यांनी तहसिलदार विशाल नाईकवाडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. देवगावातील आदिवासी कुटुंबे गेली ५०-६० वर्षे पाटबंधारे विभागाच्या जागेवर राहतात. शासनाकडून घरकुले मंजूर असूनही जागेअभावी ती मिळत नाहीत. शेतकरी भवनाजवळील शासन जागा किंवा इतर पर्यायी सरकारी भूखंड उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली. तहसिलदार नाईकवाडे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत घरकुल प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. यावेळी विजयराज पगारे, संतोष राजगुरू, तुषार वाघ, भूषण पगारे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल वाघमारे सर्वत्र कौतुक

**अक्षराज : बाळू धायगुडे**



**दि.०१, खंडाळा (सातारा) :** मुंबईतील पवई परिसरात घडलेल्या थरारक घटनेत सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल वाघमारे यांनी आपल्या पथकासह दाखवलेल्या शौर्यपूर्ण कामगिरीबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. सशस्त्र व्यक्तीकडून ओलीस ठेवण्यात आलेल्या १७ चिमुकल्या व काही वृद्धांची सुरक्षित सुटका करून वाघमारे यांनी खऱ्या अर्थाने 'जनतेचा पोलीस' ही ओळख सिद्ध केली आहे.पवई पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले एपीआय अमोल वाघमारे आणि त्यांच्या टीमने मिळालेल्या माहिती व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार घटनास्थळी तात्काळ धाव घेतली. रोहित आर्या नावाच्या सशस्त्रधारी व्यक्तीने बालक व वृद्धांना ओलीस ठेवले असल्याचे दिसून आले.परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण असतानाही वाघमारे यांनी शांतता राखत रणनीती आखली आणि सुरक्षिततेची काळजी घेत सर्व ओलीसांची सुखरूप सुटका करण्यात यश मिळवले.

कारवाई दरम्यान सशस्त्रधारी व्यक्तीचा एनकाउंटर करण्यात आला.शौर्यपूर्ण कामगिरीमुळे संपूर्ण पोलिस दलात आणि सातारा जिल्ह्यातील त्यांच्या मूळ गाव सयापूर (ता.कराड, जि.सातारा) तसेच लोणंद परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अमोल वाघमारे यांचे माध्यमिक शिक्षण मालोजीराजे विद्यालय लोणंद येथे तर शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद येथून २०१० साली इंग्रजी विषयातून पदवीधर झालेले माजी विद्यार्थी आहेत. महाविद्यालयाचे प्राध्यापक, मित्रमंडळी आणि ग्रामस्थांनी त्यांच्या धाडसी कामगिरीचे कौतुक केले जात आहे. प्रा.अमीर इनामदार सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र,सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, खंडाळा वाघमारे यांच्या शौर्या बद्दल प्रतिक्रिया देताना म्हणाले-सपोनि अमोल वाघमारे यांनी वेळप्रसंगी दाखवलेले शौर्य वाखाणण्याजोगे असून चिमुकल्यांचा जीव वाचवण्यासाठी केलेली कृती सन्मानार्थ आहे.

### शहापूर - सरळांबे रस्ता पूर्णपणे खराब; जागोजागी खड्डे, नागरिक त्रस्त

**अक्षराज : अक्षय गिरा**



**दि.०१, शहापूर (ठाणे) :** शहापूर ते सरळांबे हा मुख्य रस्ता पूर्णपणे खराब झाला असून, संपूर्ण मार्गावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. विशेषतः तूते पुलावर अनेक खोल खड्डे निर्माण झाल्याने वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. या रस्त्यावरून शहापूर, बामणे, कवडास, तूते, काळेपाडा, अर्जुनली, सरळांबे, खुटाडी अशा अनेक गावांचा संपर्क होत असल्याने ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. दररोज शाळकरी विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि गर्भवती महिलांना प्रवास करताना प्रचंड त्रास होत असून, वाहनधारकांचा ही संताप वाढला आहे. नागरिकांकडून सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

## फोर्टीज हॉस्पिटलजवळ पोलिसांची धडक कारवाई

### ४०० कोरेक्सच्या बाटल्यांसह एक जण अटक

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०१, कल्याण (ठाणे) :** पोलीस उपआयुक्त, परिमंडळ ३ यांच्या विशेष पथकाने शनिवार, दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ रोजी अमली पदार्थ विरोधी मोहिमेअंतर्गत कल्याण बाजारपेठ पोलीस ठाणे हद्दीत धडक कारवाई करत ४०० कोरेक्सच्या बाटल्या जप्त केल्या आहेत.

या प्रकरणी एका इसमाला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष पथकाचे सपोनी गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी फोर्टीज हॉस्पिटल जवळ गस्त घालत असताना, एक संशयित इसम मोटरसायकलवरून काहीतरी वस्तू घेऊन जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्याला थांबवून तपासणी केली असता, त्याच्याकडे एकूण ४०० कोरेक्सच्या बाटल्या आढळून आल्या. त्यानंतर आरोपीस मुद्देमालासह पंचनाम्यानुसार ताब्यात घेण्यात आले. हा संपूर्ण मुद्देमाल पुढील प्रमाणे.४०० कोरेक्सच्या बाटल्या (किंमत अंदाजे ₹४,००,०००/-)



काळ्या रंगाची मोटरसायकल (किंमत ₹६०,०००/-)रोख ₹३,६६०/-असा एकूण ₹४,६३,६६०/- किमतीचा आहे. अटक आरोपीचे नाव मोहम्मद मताब अनिस रईस (वय ३३ वर्षे), रा. १०/बी, गोल्डन प्लाझा, ओल्ड फिश मार्केट, मौलाना शौकत अली चौक, कल्याण (पश्चिम). या आरोपीविरुद्ध बाजारपेठ पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५७६/२०२५ अंतर्गत एनडीपीएस ॲक्ट कलम ८(क), २२(ब)(क) नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तसेच आरोपीविरुद्ध एमएफसी पोलीस ठाणे गु.र.नं. २१८/२०२५ कलम ८(क), २१(ब) अंतर्गतही गुन्हा नोंद असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बाजारपेठ पोलीस करीत आहेत.

## चंद्रपूर जिल्ह्यातून वगळलेल्या ९ तालुक्यांना पुन्हा 'नक्षलग्रस्त' म्हणून समाविष्ट करा

### आ. मुनगंटीवार यांची मुख्यमंत्र्याकडे ठोस मागणी; मुख्यमंत्र्यांनी दिले मुख्य सचिवांना कार्यवाही करण्याचे निर्देश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेऊन, चंद्रपूर जिल्ह्यातून वगळलेले नऊ तालुके पुन्हा नक्षलग्रस्त तालुके म्हणून घोषित करण्याबाबत निवेदन सादर केले.

मुख्यमंत्री महोदयांनी या मागणीवर संवेदनशीलतेने प्रतिसाद देत मुख्य सचिवांना तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील शासकीय कर्मचारीवर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. हे



निवेदन राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, जिल्हा शाखा चंद्रपूर चे अध्यक्ष दीपक जेऊरकर यांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांना दिले होते. आ. मुनगंटीवार यांनी तात्काळ दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले. आ. मुनगंटीवार यांनी निवेदनात म्हटले आहे की, ०७ डिसेंबर २००४ च्या शासन निर्णयानुसार चंद्रपूर, गोंदिया, यवतमाळ, गडचिरोली, नांदेड व भंडारा जिल्ह्यांचा नक्षलग्रस्त भागात समावेश होता. त्यानुसार नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना एकस्तर व विशेष प्रोत्साहन भत्ता मिळत होता. परंतु, २७ जून २०२५ च्या गृह विभागाच्या नव्या निर्णयानुसार चंद्रपूरसह काही जिल्ह्यांचे तालुके वगळण्यात आले आहेत. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना मिळणारा एकस्तरीय व विशेष प्रोत्साहन भत्ता बंद झाला, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक नियोजनावर गंभीर परिणाम झाला आहे. आ. मुनगंटीवार यांनी या विषयावर मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधत स्पष्टपणे नमूद केले की, चंद्रपूर जिल्ह्यातील वगळलेले तालुके अजूनही नक्षलप्रभावित क्षेत्राच्या सीमेला लागून आहेत व तेथे नक्षली हालचालीची शक्यता कायम आहे. त्यामुळे ते पुन्हा नक्षलग्रस्त यादीत समाविष्ट होणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या निवेदनाची दखल घेतली असून, मुख्य सचिवांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील कर्मचारी वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे.

## माजी आमदार दिलीप मानेंचा भाजप प्रवेश अटी शर्तीवर ?

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०१, सोलापूर :** गत आठ दिवसांपासून दक्षिण विधानसभा मतदारसंघामध्ये माजी आमदार दिलीप माने यांच्या भाजप पक्षप्रवेशावरून राजकीय नाट्य चांगलेच रंगले आहे. माने यांच्या भाजप प्रवेशाला रोखण्यासाठी आ. देशमुख यांचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झालेले पहावयास मिळाले. कार्यकर्त्यांनी पक्ष कार्यालयासमोर धरणे आंदोलन तर केलेच या उपर प्रदेशाध्यक्षांची ही भेट घेऊन त्यांच्या प्रवेशाला आपला विरोध दर्शविला. तर दुसरीकडे पालकमंत्री जयकुमार गोरे अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार सचिन कल्याण शेट्टी यांनी माजी आमदार दिलीप माने यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची



भेट घालून दिली होती, माने यांच्या भाजप प्रवेशावर शिक्कामोर्तब करण्यात आले होते.

देशमुख यांच्या कार्यकर्त्यांच्या प्रखर विरोधामुळे तूर्तास माने यांच्या पक्ष प्रवेशास ब्रेक लावण्यात आला आहे. यावर माजी आ. माने यांचे कार्यकर्ते आणि स्वतः माने हे भाजप पक्षप्रवेशावर सध्या कोणतीही प्रतिक्रिया देताना दिसून येत नाहीत. असे जरी असले तरी मतदारसंघातील नागरिकांना माने यांना

भाजप पक्षात पक्षप्रवेश मिळेल का? आमदार सुभाष देशमुख यांचे कार्यकर्ते आणि स्वतः देशमुख माने यांचा प्रवेश रोखू शकतील काय? यामध्ये कोण वरचढ ठरेल? याची चर्चा सध्या मतदारसंघांमध्ये रंगताना दिसून येत आहे.

माजी आमदार दिलीप माने यांचा भाजप पक्षामध्ये पक्षप्रवेश होईल असे वाटते, आमदार सुभाष देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना दिलीप माने यांना पक्षामध्ये आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सहभाग न घेण्याच्या अटीवर, भाजपच्या निष्ठावान कार्यकर्त्यांवर अन्याय होणार नाही याचा विचार करून पक्ष प्रवेश द्यावा असे म्हटले होते. त्यामुळे माने यांचा भाजप पक्ष प्रवेश अटी शर्तीवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी आमदार दिलीप माने यांचे मैत्रीपूर्ण संबंध आणि अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची बाजार समिती निवडणुकीतील युतीचा फायदा दिलीप माने यांना पक्षप्रवेश करण्यास पूरक ठरणार आहे. याचबरोबर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर होणार असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निवडणुकांमध्ये सत्ता ताब्यात घेण्यासाठी कोणतीही तडजोड स्विकारणार नाहीत असे दिसते. त्यामुळे माने यांचा पक्षप्रवेश अटी शर्तीवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## पालक सचिव शैला ए. यांच्या जिल्हा आढावा बैठकीला उत्साही प्रतिसाद

### सामाजिक बांधिलकी समजून शासकीय योजना राबवाव्यात - पालक सचिव शैला ए.

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, बुलडाणा :** वित्त विभागाच्या सचिव तथा बुलढाणा जिल्ह्याच्या पालक सचिव शैला ए. यांनी आज जिल्ह्यातील विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा सखोल आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, शासनाच्या सर्व योजना या केवळ आकडेवारीपुरत्या मर्यादित न राहता जनतेच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणाऱ्या ठराव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, मुख्य वनसंरक्षक सरोज गवस, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्याचा सर्वांगीण परिचय करून दिला.

शैला ए. यांनी जिल्ह्यातील आर्थिक, सामाजिक, कृषी, आरोग्य, शिक्षण, पर्यटन, जलसंधारण, पायाभूत सुविधा, तसेच रोजगार निर्मिती क्षेत्रातील कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी मनरेगा, प्रधानमंत्री आवास योजना, जलजीवन मिशन, उज्ज्वला योजना, पीएम किसान निधी, फळबाग लागवड, अन्न प्रक्रिया उद्योग, तसेच तीर्थक्षेत्र आणि लोणार सरोवर विकास आराखडा यासारख्या प्रमुख



योजनांवर विशेष भर दिला. पालक सचिवांनी अधिकाऱ्यांना सुचविले की सर्व विभागांनी परस्पर समन्वय साधून जनतेच्या सहभागातून योजनांची अंमलबजावणी करावी, तसेच प्रत्येक योजना जनतेच्या हितासाठी अशा दृष्टीने पार पाडावी.

## पदवीधर युवकांनी मतदार नोंदणी करावी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, राजुरा (चंद्रपूर) :** पदवीधर मतदार नोंदणी अभियान आता अंतिम टप्प्यात आले असून पात्र पदवीधरांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन चंद्रपूर जिल्हा कॅांग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे यांनी केले आहे. जिल्हा कॅांग्रेस कमिटी, जिल्ह्यातील वरिष्ठ नेते, तसेच स्थानिक पदाधिकारी



आणि कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे. या अभियानात आ. विजय वडेट्टीवार, खा. प्रतिभा धानोरकर, खा. डॉ. नामदेव किरसान, जिल्हा प्रभारी व नागपूर पदवीधर मतदार संघाचे आ. अभिजित वंजारी यांच्यासह तालुका स्तरावरील सर्व कॅांग्रेस नेते सक्रिय सहभागी असून, मतदार नोंदणीबाबत विविध ठिकाणी बैठका, मेळावे आणि संपर्क अभियान आयोजित करण्यात आलेले आहेत. जिल्ह्यातील अनेक ठिकाणी कार्यकर्ते स्वयंसेवक म्हणून काम करत असून, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था आणि शहरी तसेच ग्रामीण भागातही मतदार नोंदणी फॅार्म भरण्याचे कार्य सुरु आहे. मात्र, आता दि. ६ नोव्हेंबर २०२५ ही पदवीधर मतदार नोंदणीची अंतिम तारिख असल्याने सर्व जबाबदार पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष लक्ष देऊन पात्र पदवीधरांचे अर्ज निश्चितपणे भरुन घ्यावेत, असे जिल्हाध्यक्ष सुभाष धोटे यांनी कार्यकर्त्यांना तसेच संबंधितांना केले आहे. प्रत्येक पात्र पदवीधराने या प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. या अभियानामुळे जिल्ह्यातील पात्र पदवीधरांमध्ये उत्साह निर्माण झाला असून, कॅाग्रेस कार्यकर्त्यांच्या पुढाकारामुळे नोंदणी प्रक्रियेला गती मिळत आहे.

# सात जन्म तर दूरच... लग्नाच्या आदल्या दिवशीच नवरी पळाली भुर्ररर...



## म्हैसगावात वरपक्षाची लाखोंची फसवणूक !!

● **पोलिसांसह समाजाची जबाबदारी !**

तरुणांची आर्थिक फसवणूक होण्याच्या घटनांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. कारण ही केवळ फसवणूकच नव्हे, तर तरुणांच्या आयुष्याशी खेळ आहे. विवाहपूर्व ओळख व व्यवहारासाठी काही कायद्याची ठोस चौकट तयार करण्याची वेळ आली आहे. पोलिसांनी अशा तक्रारींवर तत्काळ कारवाई करावी. मुलीचा विवाह करण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळक्यांवर करडी नजर ठेवणे गरजेचे आहे.

● माझी आर्थिकचं नव्हे, तर मानसिक मोठी फसवणूक झाली आहे. नवरीचे नातेवाईक मला धमक्या देत आहेत. दोन दिवसांपासून मी पोलिस ठाण्यात हेलपाटे मारतोय, पण गुन्हा दाखल होत नाही, माझ्याकडे सर्व पुरावे असूनही पोलिस उडवा-उडवीची उत्तरे देत आहेत. माझा जिविताला धोका आहे.

**- राहुल गागरे, म्हैसगाव, ता.राहुरी**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, राहुरी (अहिल्यानगर) :** अलीकडे मुलांची लग्न जुळत नसल्याचे प्रकार समोर येत असून दुसरीकडे याच गोष्टीचा फायदा घेऊन काही जणांनी नवऱ्या मुलासह त्याच्या कुटुंबाला गंडा घालण्याचा जणू धंदाच सुरू केला आहे. याचा फटका अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील म्हैसगाव येथे गागरे कुटुंबाला बसला आहे.

वरपक्षाने लाखो रुपये खर्च करून शुभविवाहाची सर्व तयारी पूर्ण केली, मात्र लग्नाच्या आदल्या दिवशीच नवरीसह तिचे नातेवाईक अचानक पसार झाल्याची धक्कादायक घटना पुन्हा घडल्यामुळे राहुरीत संतापाची लाट उसळली आहे. राहुरी तालुक्यातील म्हैसगाव येथे ही घटना घडली.

राहुल त्रिंबक गागरे या ३० वर्षिय तरुणाचा विवाह राहुरी शहरातील एका तरुणीसोबत ठरला होता. राहुल गागरे शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. विवाह ठरविण्यासाठी नातेवाईकांच्या मदतीने त्याची राहुरीतील एका मुलीशी ओळख करून देण्यात आली. दोन्ही कुटुंबियांकडून पाहणी झाल्यानंतर लग्न ठरले. नवरीच्या वडिलांनी वेळोवेळी वरपक्षाकडून दीड लाख रुपये रोकड, २० हजाराचा मोबाईल, नातेवाईकांसाठी कपडे व भेटवस्तू घेतल्या.

विवाह सोहळा २६ ऑक्टोबर रोजी राहुरी खुर्द येथील राजेश्वर मंदिराजवळ पार पडणार होता, मात्र टाळी वाजण्याआधीच नवरीचे घर रिकामे झाले. वरपक्षाने फोन, संदेश, संपर्क करणे हे सगळे प्रयत्न केले, परंतू ते सर्व व्यर्थ ठरले.

## मानवी लैंगिक तस्करीविरोधी सामाजिक लढा

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर व अर्ज फौंडेशन तर्फे कार्यशाळा संपन्न




**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०१, सोलापूर :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर व अर्ज फौंडेशन गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी लैंगिक तस्करी प्रतिबंध काळजी व लढा या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा कार्यशाळेचे उद्घाटक मनोज शर्मा हे अध्यक्ष स्थानी होते. अध्यक्षीय मनोगतात मनोज शर्मा यांनी मानवी लैंगिक तस्करी वर प्रतिबंध करणे हे प्रत्येक नागरिकांची जबाबदारी असल्याचे नमूद केले. कार्यशाळेत लैंगिक तस्करी या गंभीर सामाजिक प्रश्नावर सखोल चर्चा करण्यात आली. या प्रसंगी व्यासपीठावर दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर. ओ. एस.पाटील, एस. एस. शिंदे, एम. बी. कुडते, ए.एस.बिराजदार आदी न्यायाधीश व अर्ज फौंडेशन चे फॉउंडर अरुण पांडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेत सामाजिक कार्यकर्ते, पोलीस अधिकारी, विधी सेवेचे पॅनल विधीज्ञ, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, महिला व बाल विकास विभाग, बाल न्यायमंडळ, सखी वन स्टॉप सेंटर आदीं सहभागी झाले होते.

कार्यशाळेत अरुण पांडे यांनी भारतातील वाढती लैंगिक तस्करी, तिची कारणं, कायदेशीर तरतूदी (POCSO, ITPA B.) तसेच बळी पडलेल्या महिलांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक उपाययोजना या विषयी मार्गदर्शन केले. डॉ. रुपेश पाठक लैंगिक तस्करी बाधित महिलांची मानसिकतेविषयी व सामाजिक भूमिकानविषयी मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्त्यांनी जनजागृती, प्रतिबंध आणि पुनर्वसन या तीन पातळयांवर एकत्रितपणे काम करण्याची गरज अरुण पांडे यांनी व्यक्त केली.

या कार्यशाळेत उपस्थित सामाजिक कार्यकर्ते यांनी प्रश्न उपस्थित केला की तस्करीच्या घटनांमध्ये प्रशासन, पोलीस आणि समाज यांच्यात समन्वय वाढवण्यासाठी ठोस यंत्रणा तयार करता येईल का? या चर्चेला सर्वांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. कार्यशाळेचा उद्देश समाजात संवेदनशिलता निर्माण करुन प्रत्येक नागरिकाने 'तस्करीविरुध्द आवाज उठवणे' हा सामाजिक संकल्प घ्यावा, असा होता.

समारोपावेळी सर्वांनी सुरक्षित समाज सन्मानाचे जीवन हा संदेश देत लैंगिक तस्करीविरोधी लढयात सक्रिय राहण्याची प्रतिज्ञा केली.

कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रमुख जिल्हा न्यायाधीश. मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी आणि अर्ज फौंडेशन च्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेचे सुत्रसंचालन विधीज्ञ शिवकैलास झुरळे यांनी केले तर आभार डॉ. रुपेश पाठक यांनी मांडले.

# घणसोलीत ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे रस्त्याचे काम रखडले



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०१, घणसोली :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या एफ विभाग कार्यक्षेत्रातील घणसोली सेक्टर ११ येथे रस्त्यांची दुरवस्था झाली असून, कंत्राटदाराच्या कासवगतीमुळे आणि निष्काळजीपणामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि असंतोष पसरला आहे. आगरी चौक सेक्टर १६ ते संत निरंकारी चौक सेक्टर ८ पर्यंतच्या अवध्या ५०० मीटर रस्त्याचे रस्ते, गटार आणि पथपद काम एक वर्षापासून अधिक काळ अर्धवट अवस्थेत आहे. गेल्या एक वर्षापासून हे काम रखडल्याने रहिवासी, शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि वाहनचालक कमालीचे त्रस्त झाले आहेत.

गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित काम सुरू झाल्याने आनंद आहे. परंतु काम फारच संथ गतीने सुरू आहे. एक वर्ष होत आले तरीही कॉन्ट्रॅक्टरने कामाची गती वाढवली नाही. गटाराचे काम एकूण ३०० मीटरख्या आसपास अजूनही बाकी आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे झाले आहेत. त्यामुळे गरोदर महिला अथवा वृद्ध व्यक्तींना ने-आण करण्यास भीती वाटते अशी संतापजनक प्रतिक्रिया रिक्षा संघटनेचे अध्यक्ष म्हात्रे यांनी दिली.

नागरिकांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे त्वरीत दखल घेण्याची आणि कठौर कारवाई करण्याची मागणी केली आहे. सध्याच्या निष्क्रिय कंत्राटदाराचा कंत्राट तातडीने काढून घेऊन काळ्या यादीत टाकावे. नवीन आणि योग्य कंत्राटदाराची नेमणूक करावी, जेणेकरून रसयाचे काम लवकरात लवकर पूर्ण होऊन नागरिकाना दिलासा मिळेल. प्रशासनाने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने पाऊले उचलावीत, अन्यथा नागरिक तीव्र आदोलन करणार आहेत. प्रमुख समस्या, प्रवाशांचे हाल आणि प्रशासकीय उदासीनता दिसून येते. दरम्यान संथगतीचे काम आणि मुदतवादः गतवर्षी दिवाळीनंतर सुरू झालेले रस्त्याचे काम आजही गटार बनवण्यात अडकले आहे. कंत्राटदाराला काम पूर्ण करण्यासाठी दिलेली मुदतही संपली आहे, तरीही कामाची गती वाढलेली नाही. रस्त्याची दुर्दशा आणि धोकेः पाऊस आणि कामातील विलंबामुळे संपूर्ण रस्ता तात्पुरता खडी, भुख आणि जीसबी टाकून तयार केला आहे. ज्यामुळे तो पूर्णपणे खड्डेमय झाला आहे. यामुळे वाहतुकीची कोंडी नित्याची झाली आहे. तसेच अरुंद रस्त्यांमुळे आणि खोदलेल्या भागांमुळे अनेकदा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आरोग्यावर परिणामः रस्त्याच्या कामामुळे परिसरात प्रचंड घुजीचे साम्राज्य पसरले आहे. ज्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रवाशांचे हाल खराब सत्यामुळे गरोदर महिला, रुग्ण, शाळकरी मुले आणि वृद्धांना मोठ्ठा प्रमाणात कसरत करावी लागत आहे. तसेच रुग्णवाहिकांनाही त्रास सहन करावा लागत आहे. कामात अनियमितताः घणसोली जम बीच मार्गावरील सुमारे दीड किलोमीटर रस्त्याचे काँक्रिटीकरण, गटार आणि पंचपद बनवण्याचे काम झाले असताना ५०० मीटरचा डांबरी रस्ता एका वर्षातही तयार झाला नसल्याने कामातील दिरंगाई स्पष्ट होत आहे.

# शिवजयंती उत्सव समितीच्या पाठपुराव्याला यश...

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०१, महाबळेश्वर :** गेल्या अनेक दिवसांपासून शिवजयंती उत्सव समिती महाबळेश्वर आणि शिवभक्तांनी केलेल्या अथक पाठपुराव्याला अखेर यश मिळाले. महाबळेश्वर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या सुशोभीकरणासाठी जिल्हा नियोजन समिती मार्फत निधी मंजूर करण्यात आला आहे.

या निधीसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, खा.श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांनी विशेष प्रयत्न केले. या सर्व मान्यवरांच्या विशेष प्रयत्नांमुळे सुशोभीकरणाचे काम पूर्णत्वास जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे सुशोभीकरण झाल्यास महाबळेश्वरच्या सौंदर्यात आणखी भर पडेल आणि महाराजांचे प्रेरणादायी स्थान अधिक आकर्षक होईल. जिल्हा नियोजन समितीच्या निधीमुळे चौकाचे सुशोभीकरण होणार आहे. शिवजयंती उत्सव समिती व महाबळेश्वर वासियांनी सर्व लोकप्रतिनिधींचे आभार मानले आहेत.

समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आणि शिवभक्तांनी घेतलेल्या कष्टामुळे आणि सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळेच हा ऐतिहासिक निर्णय झाला, असे मत समितीच्या वतीने व्यक्त करण्यात आले.

छ.शिवाजी महाराजांच्या नावाच्या चौकाचे सुशोभीकरण हे केवळ काम नाही, तर ती शिवभक्तांसाठी अभिमानाची बाब आहे. लोकप्रतिनिधींनी आमच्या मागणीची दखल घेऊन तत्काळ निधी उपलब्ध केल्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.आता लवकरच या निधीतून छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे काम सुरू करावे आणि महाबळेश्वर शहराच्या वैभवात भर पाडावी अशा भावनाही शिवभक्तांनी व महाबळेश्वर वासियांनी व्यक्त केल्या आहेत.

# थोडक्यात

## डॉ.संपदा मुंडे प्रकरणात उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांचे निर्देश



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०१, सातारा :** फलटण तालुक्यातील डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणात विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी सातारा जिल्हा रुग्णालय प्रशासनाला मागील दोन वर्षांचा विशाखा समितीचा अहवाल तात्काळ सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच सातारा पोलीस अधीक्षक कार्यालयाने या प्रकरणातील चार्जशीट वेळेत दाखल करावे असे आदेश ही दिले. या प्रकरणातील कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीला डॉ. कादंबरी बलकवडे आयुक्त आरोग्य सेवा, डॉ.नितीन अंबाडेकर संचालक आरोग्य सेवा हे समक्ष उपस्थित होते. तर दुरदृश्य प्रणालीद्वारे पोलीस अधीक्षक सातारा तुषार दोषी, जिल्हा चिकित्सक सातारा डॉ युवराज कर्पे, धुमाळ वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय फलटण डॉ. अंशुमन धुमाळ, डॉ.आर.बी पवार उपसंचालक पुणे, सहभागी झाले होते. तसेच, राज्य महिला आयोग माजी सदस्या व शिवसेना महिला आघाडी पदाधिकारी संगीता चव्हाणही यावेळी उपस्थित होत्या.

## केरा व मणदुरे उपसासिंचन योजनेचा आराखडा तयार होताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात करा - पालकमंत्री देसाई



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०१, सातारा :** केरा व मणदुरे भागातील अडीच हजार हेक्टर क्षेत्रावरील सिंचनासाठी सर्वेक्षण होणार आहे. हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर आराखडा तयार होईल. यानंतर त्वरित प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

केरा, मणदुरे विभागातील निवकणे चिटेघर व बिबी या लघु प्रकल्पाच्या दोन्ही तीरावरील गावांना १०० मीटर उंचीपर्यंत शेतीसाठी उपसा सिंचनाद्वारे पाणी उचलून देण्याच्या सर्वेक्षण कामाचा शुभारंभ पालकमंत्री श्री. देसाई यांच्या हस्ते झाला. केरा तालुका पाटण येथे झालेल्या कार्यक्रमास दादासाहेब जाधव, दादासाहेब पाटील, भरत पाटील, अभिजीत पाटील, एन.डी पाटील यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.


## पोलीस विभागाच्यावतीने एकता दौडचे आयोजन




**अक्षराज : विकास दळवी**

**दि.३१, सातारा :** सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने पोलीस विभागाच्यावतीने एकता दौडचे आयोजन करण्यात आले. पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, उपपोलीस अधीक्षक (गृह) अतुल सबणीस यांच्यासह पोलीस विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी दौडीमध्ये उत्साहात सहभाग घेतला. सरदार वल्लभभाई पटेल यांनी आपले संपूर्ण आयुष्य हे देशाच्या एकतेसाठी वाहिले. त्यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सातारा पोलीस दलाच्यावतीने एकता दौडचे आयोजन करण्यात आले. या दौडमध्ये देशभक्तीवर विविध गाणी तसेच घोषणा, विविध फलक घेऊन एकता दौड ही पोलीस मुख्यालय-पोवई नाका - पोलीस कवायत मैदान अशी काढण्यात आली, देशाच्या हितासाठी देशाची एकता खूप महत्वाची असल्याचेही पोलीस अधीक्षक दोशी यांनी यावेळी सांगितले.

## अफजलखान वधाचे शिल्प बसविण्यासाठी हिंदू एकता करणार आंदोलन



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.३१, सातारा :** ऐतिहासिक प्रतापगडाच्या पायथ्याशी तयार असलेले अफजलखान वधाचे 'शिवप्रतापाचे शिल्प' ताबडतोब बसविण्यात यावे. या मागणीसाठी हिंदू एकता आंदोलन आक्रमक झाले आहे. या मागणीकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मंगळवार, दि. ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने आयोजित करण्याचा निर्णय नुकत्याच झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत घेण्यात आला. माधवनगर सर्किट हाऊस, सांगली येथे पार पडलेल्या या बैठकीत, हिंदू एकता आंदोलनाचे प्रदेशाध्यक्ष व माजी आमदार नितीन शिंदे यांनी ही घोषणा केली.

## माहूर तालुक्यात विविध उपक्रमाद्वारे जनजागृती

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, नांदेड :** राज्य शासनाकडून २७ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह-२०२५ दक्षता आपली सामायिक जबाबदारी आयोजित करण्यात आला आहे.

या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक संदीप पालवे, अपर पोलीस अधीक्षक अशोक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षता जनजागृती सप्ताहाचा कार्यक्रम आज विविध ठिकाणी घेण्यात आला.